**सं.फौ.ख.नं.–७९/२०१५**

**निशाणी क्र.–१९ सोबत**

**शपथेवर उलट तपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री.ए.एस.देशमुख यांचेमार्फत सुरु**

माझे शिक्षण ७ वी झालेले आहे. माझे मुळ गांव जवळवाडी आहे. माझे वडीलांचे नांव चिमाजी बाबू डिगे आहे. माझे वडीलांना ४ मुले नामे दत्तात्रय, शामराव, शंकर व मी स्वतः आणि ३ मुली नामे ताराबाई जोतीबा आगलावे, रुक्मीणी लक्ष्मण शिंदे व फुलाबाई बाजीराव सरडे असे आहेत. दत्तात्रय, शामराव, शंकर हे हयात नाहीत. तसेच बहीणी देखील हयात नाहीत. आमच्या वडीलोपार्जित जमीनीचे गट नंबर मला16 pt सांगता येणार नाहीत. परंतू त्यापैकी एक जमीन एम.एस.ई.बी. ऑफिसजवळ आहे व एक जमीन गावाच्या वर आहे. आमचे वडीलोपार्जित दोन घरे आहेत. वडीलोपार्जित एक घर माझ्या वडीलांच्या नांवे आहे व नविन बांधलेल्या घराला तिघा भावांची नांवे आहेत. नविन घराचा घर नं.६२ हा संपत यांचा आहे. घर नं.६० हा शामराव यांचा आहे व घर नं.६१ हा शंकर यांचा आहे. घर नं.६२ हे स.नं.५/२ मध्ये सन १९७८ साली बांधलेले आहे. त्या घराची ग्रामपंचायतीला नोंद सन १९७८ सालीच झाली आहे. सन १९७८ साली घर बांधले व १९७८ सालीच घराची नोंद केली. घराच्या नोंदीला शामराव चिमाजी डिगे यांनी अर्ज दिला होता. स.नं.५/२ हा ३७ गुंठ्याचा आहे. स.नं.५/२ हा माझे वडीलांचे नांवे पूर्वी कधी होत हे मला सांगता येणार नाही. स.नं.५/२ ला वारस म्हणून आमची नांवे लागली का हे मला आठवत नाही. वडीलांच्या मृत्युनंतर स.नं.५/२ ला वारसांची नांवे नोंद व्हावी असा अर्ज कोणी दिला नव्हता. स.नं.५/२ ला माझे16 pt आईचे व बहीणींचे नांवे लागली होती का हे मला सांगता येणार नाही. स.नं.५/२ ला माझे नांव कधी लागले ते मला सांगता येणार नाही. शामराव व संपत यांची नांवे कधी लागले ते मला सांगता येणार नाही.

**कोर्टाची वेळ संपलेने उलट तपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

श्रवणोत्तर स्वीकृत

16/07/2024

(रविंद्र भ. खवले)

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,मेढा.

मेढा

दि.१६/०७/२०२४